लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ४.००
सातारा, शुक्रवार, दि. ५ ऑक्टोबर २०१८

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# कोरेगावात क्रीडा संकुल उभारणार

## शरद पवार; विविध विकासकामांच्या भूमिपूजनप्रसंगी आश्वासन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरेगाव :** 'रयत शिक्षण संस्थेने पारंपरिक शिक्षणाऐवजी व्यवसायाभिमुख शिक्षण देण्याचे काम हाती घेतले आहे. कोरेगावमध्ये शिक्षणात मुलींचे प्रमाण सर्वाधिक असून, त्यांनी देखील भारतीय सैन्य, नौदल व हवाई दलामध्ये जाण्यासाठी प्रयत्न करावेत, संस्था त्यांना निश्चितपणे पाठबळ देईल,' अशी ग्वाही संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी दिली. दरम्यान, संस्थेतर्फे कोरेगावात क्रीडा संकुल उभारणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये संस्थेच्या शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने विविध उपक्रमांचा प्रारंभ व मुख्य इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन खासदार पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी चेअरमन डॉ. अनिल पाटील होते. व्यासपीठावर आमदार शशिकांत शिंदे, आमदार विश्वजित कदम, संस्थेचे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे, कार्यकारिणी सदस्य रामशेठ ठाकूर, संजीव पाटील, सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत आदी उपस्थित होते.

खासदार पवार म्हणाले, 'कोरेगावकरांशी माझा जुना ऋणानुबंध आहे. आजवर माझा शब्द तालुक्याने पाळला असून, आम्ही दिलेल्या उमेदवारांना प्रभावीपणे काम करण्याची संधी दिली आहे. डी. पी. भोसले कॉलेजविषयी अगोदर उलट्या बातम्या येत होत्या, आता सुलट्या येत आहेत. इतका आमूलाग्र बदल कॉलेजमध्ये झाला आहे. ६८ टक्के विद्यार्थिनी असलेल्या महाविद्यालयाने सर्वच बाबतीत अग्रेसर राहून निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. भविष्यात या कॉलेजच्या विद्यार्थिनींनी सैन्य, नौदल आणि वायूदलामध्ये अधिकारी होण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यासाठी आवश्यक ते सहकार्य संस्थेतर्फे केले जाईल. मुलींना जर संधी दिली तर त्या क्रांती घडवू शकतात,' याची वेगवेगळी उदाहरणे त्यांनी यावेळी दिली.

डॉ. अनिल पाटील म्हणाले, 'कोरेगावच्या मातीत लक्ष्मीबाईंच्या अश्रूंमुळे रयत शिक्षण संस्थेची बिजे रोवली गेली. कर्मवीरांना शिक्षण क्षेत्रात काम करण्याचा विचार कोरेगावातच आला आणि ते पायी सातारा येथे चालत गेले. तेथे भाऊ पाटील, पाटील मास्तर आणि त्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील म्हणून ते ओळखले गेले. त्यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती केल्याने आजवर लाखो विद्यार्थी घडले आहेत.' आ. शशिकांत शिंदे म्हणाले, 'कोरेगाव तालुका हा इतिहास घडविणारा तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्याने खासदार शरद पवार यांच्या विचारांनाच स्थान दिले आहे.'

### क्रीडा संकुल व रुई हायस्कूलला निधी

रयत शिक्षण संस्थेने शताब्दी वर्षाचे औचित्य साधून कोरेगाव कॉलेजच्या क्रीडा संकुलासाठी दहा लाख रुपये तर रुई हायस्कूलच्या शाळा खोल्या उभारणीसाठी पाच लाख रुपयांचा निधी दिला. खासदार शरद पवार व आमदार शशिकांत शिंदे यांच्या हस्ते रुई हायस्कूलला धनादेश प्रदान करण्यात आला. मुंबईतील उद्योजकांनी देखील या हायस्कूलसाठी पाच लाख रुपयांचा निधी दिला असून, त्याच्या धनादेशाचे देखील वितरण करण्यात आले.

### पवार यांचे संकेत....शशिकांत शिंदे हेच उमेदवार

खासदार पवार यांच्या कोरेगाव दौऱ्याविषयी तालुक्यात चर्चा होती. राष्ट्रवादी काँग्रेस अंतर्गत गटबाजी, स्वाभिमानी विचारधारा यामुळे खा. पवार कोरेगावात नेमके काय बोलणार, याकडे सर्वांचे लक्ष होते. शिक्षण क्षेत्रातील कार्यक्रम असला तरी विद्यार्थ्यांबरोबरच राजकीय क्षेत्रातील दिग्गज पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. भाषणाच्या सुरुवातीलाच खा. पवार यांनी कोरेगावचा माझा जुना ऋणानुबंध आहे. ज्या उमेदवारांना आम्ही पाठवले, त्यांना तुम्ही स्वीकारले. शंकरराव जगताप, डॉ. शालिनीताई पाटील यांच्याबरोबर गेली दहा वर्षे शशिकांत शिंदे यांना काम करण्याची संधी दिली. विधिमंडळ आणि माध्यमांमध्ये प्रभावीपणे पक्षाचे प्रवक्ते म्हणून ते काम करत आहेत, असे ते म्हणाले. त्यांच्या बोलण्याचा धागा पकडून कार्यकर्त्यांनी टाळ्या वाजवल्या.